सुरक्षा रक्षक मंडळे/माथाडी मंडळे या मंडळांत आर्थिक बाबींशी संबंधित प्रकरणी शासनाची मान्यता घेण्यासंदर्भातील अट शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्र. युडब्ल्युए-२०१४/प्र.क्र. ५८३/कामगार-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०१७.

<u>**वाचा :**</u> १) शासन आदेश क्रमांक : एसजीए-१५०९/प्र.क्र.१७५८/कामगार-५, दि. २५.०१.२०१०.
२) शासन आदेश क्रमांक : युडब्ल्युए-२०१४/प्र.क्र.५८३/कामगार-५, दि. ४.१२.२०१४.
३) शासन आदेश क्रमांक : युडब्ल्युए-२०१४/प्र.क्र.५८३/कामगार-५, दि. ११.०९.२०१७
४) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. सुरक्षा माथाडी/खरेदी /२०१७/ कार्या.१४/३८४ दि. ०३.१०.२०१७

आदेश

माथाडी/सुरक्षा रक्षक मंडळांना शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळत नसल्यामुळे व माथाडी तसेच सुरक्षा रक्षक अधिनियमातील व या अधिनियमांतर्गत मंडळांना लागू करण्यात आलेल्या योजनेमधील विहीत तरतूदीनुसार प्राप्त वैधानिक प्राधिकारांतर्गत मंडळाचे कार्य व योजनेची अंमलबजावणी करणे सुसह्य होणे आवश्यक असल्यामुळे संदर्भादिन दि. ११.०९.२०१७ रोजीच्या आदेशान्वये सुरक्षा रक्षक /माथाडी मंडळ या मंडळांत आर्थिक बाबींशी संबंधित प्रकरणी शासनाची मान्यता घेण्यासंदर्भातील अटी शिथिल करण्यात आलेल्या आहेत.

२) उपरोक्त शासन आदेशासंदर्भात कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भाधिन दि. ३.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंडळांचे दैनंदिन प्रशासकीय व वैधानिक कामकाज सुव्यवस्थितपणे पार पाडण्याकरता दि.११/०९/२०१७ रोजीच्या आदेशामधील (अ) व (ब) मध्ये सुधारणा प्रस्तावित केली आहे. यास्तव या आदेशाव्दारे दि. ११.०९.२०१७ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन खालील प्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत.

(अ) माथाडी/सुरक्षा रक्षक मंडळांमधील कर्मचारी यांचे वेतन व इतर भत्ते, सुरक्षा रक्षक मंडळामधील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते इत्यादी, तसेच माथाडी / सुरक्षा रक्षक मंडळांचे दैनंदिन प्रशासकीय व वैधानिक कामकाज करताना आवश्यक ती कार्यालयीन खरेदी व नियमित होणारा कार्यालयीन खर्च, संबंधीत मंडळे स्वायत्त असल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे कार्यालयीन खरेदी विषयी धोरण व निर्णय अंमलात असेल ते मार्गदर्शक मानून व त्याच्याशी सुसंगत राहून नियमानुसार अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित मंडळांना प्रदान करण्यात येत आहेत.

(ब) मंडळांचे कामकाज गतीमान पध्दतीने व कार्यक्षम होण्यासाठी शासनाचे, भांडार खरेदी विषयक धोरण आहे ते मार्गदर्शक मानुन तसेच वाहन खरेदीविषयीचे शासनाचे जे धोरण आहे ते मार्गदर्शक मानुन त्या सबंधीत तरतुदीचे काटेकोर पालन करुन सविस्तर प्रस्ताव कामगार आयुक्त यांच्या मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक राहील व कामगार आयुक्त यांचे मान्यतेनंतर त्यावर मंडळ कार्यवाही करेल. तथापी, वरील प्रयोजनाव्यतिरीक्त खरेदी करावयाची झाल्यास अथवा

मंडळाच्या कामकाजाकरीता नव्याने योजना सुरु करावयाची झाल्यास किंवा आर्थिक बाबीशी निगडीत धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा झाल्यास, त्यानुसार त्या योजनेचा आवश्यक तो प्रकल्प अहवाल व खर्चासंबधीचा सविस्तर प्रस्ताव कामगार आयुक्त यांचे मार्फत शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

(क) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग-४, दि. १.१२.२०१६ अन्वये शासनाने निश्चित केलेली खरेदी प्रक्रिया राबविणे बंधनकारक राहील. शासनाने वेळोवेळी या संबंधी निर्गमित केलेल्या आदेशांचे/निर्देशांचे अनुपालन करणे कामगार आयुक्त व सर्व संबंधितांना बंधनकारक राहील.

(ड) या संबंधातील आर्थिक बाबींचे कोणतेही दायित्व शासनावर राहणार नाही.

३) सदरहू आदेश महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम ७(४), तसेच महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये शासनास असलेल्या प्राधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

४) सदरहू आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता कामगार आयुक्त व सर्व संबंधितांनी घ्यावी.सदरहू आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

५) सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७११०७१२१८१२७११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sanjay Vithoba Kalbhor
Date: 2017.11.07 16:40:01 +05'30'

(संजय काळभोर)
कार्यासन अधिकारी

प्रत:-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई (पत्राने)
२) मा.मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.मंत्रालय, मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६,मंत्रालय समोर, नरिमन पॉईंट, मुंबई.
५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक.मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक, मुंबई.
१०) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, सी-२०,ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व),मुंबई.

११) सह कामगार आयुक्त,कामगार भवन, सी-२०,ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),मुंबई.
१२) कामगार उप आयुक्त, कामगार भवन, सी-२०,ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),मुंबई.
१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक /माथाडी मंडळे.
१५) सर्व कार्यासने, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) निवड नस्ती (कामगार-५).